# दिव्यांग यशोगाथा

## समावेशित शिक्षण सक्षमीकरण विभाग

" उमलणं आणि फुलणं यात
एका अक्षराचे अंतर आहे,
उमलणं आधी तर फुलणं
त्याच्या नंतर आहे. "



सन २०२२ - २३

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

# ॥ दिव्यांग यशोगाथा ॥


| | | |
|---|---|---|
| **प्रवर्तक** | : | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन |
| **प्रकाशक** | : | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| **प्रेरणा** | : | **मा.रणजितसिंह देओल** (भा.प्र.से.)<br>प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य |
| | : | **मा.सुरज मांढरे** (भा.प्र.से.)<br>आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| | : | **मा. कैलास पगारे** (भा.प्र.से.)<br>राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई |
| | : | **मा. कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)<br>संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, महाराष्ट्र, पुणे |
| **संपादन व संपादक** | : | **डॉ. मंजुषा क्षीरसागर**<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| **संपादन सहाय्य** | : | **डॉ. गिरीश बोरसे-** अधिव्याख्याता- जिल्हा शि. व प्र.सं.धुळे<br>**श्रीमती. नम्रता प्र.सोनवणे -**विशेष शिक्षिका, गट साधन केंद्र, पं.स.धुळे |
| **शब्दांकन** | : | **श्रीमती. नम्रता प्रल्हाद सोनवणे -** विशेष शिक्षिका, गट साधन केंद्र, पं.स.धुळे |
| | : | **श्रीमती. प्रतिभा गरीबदास अहिरे-** समावेशित विषयतज्ज्ञ-गट साधन केंद्र, पं.स.धुळे |
| | : | **श्रीमती. नेहा अशोक जाधव -** विशेष शिक्षिका- गट साधन केंद्र, पं.स.धुळे |
| | : | **श्रीमती. संजीवनी भरत पाटील-** विशेष शिक्षिका, महानगरपालिका, धुळे |
| | : | **सौ.शुभांगी शेखर बनछोड -** विशेष शिक्षिका, महानगरपालिका,धुळे |
| | : | **श्रीमती.जरीनाबहेन अहमदशाह फकीर-** विशेष शिक्षिका, महानगरपालिका,धुळे |
| **प्रकाशन वर्ष** | : | **२०२२-२३** |
| **अर्थसहाय्य** | : | प्रोग्राम ॲण्ड ॲक्टिव्हीटी अंतर्गत शासनाकडून उपलब्ध निधीतून मोफत वितरणासाठी |
| **मुद्रक** | : | का. स. वाणी, धुळे |

## ✻ अनुक्रमणिका ✻



| अ.नं. | शीर्षक | शाळेचे नांव | शिक्षकाचे नाव | पा.क्र. |
|---|---|---|---|---|
| १) | **शेखरचे पहिले पाऊल** | जि.प.शाळा सोनगीर नं.४, ता. धुळे | श्रीमती. नेहा अशोक जाधव | ४ |
| २) | **तिच्या अथक प्रयत्नांना यश** | जि.प.शाळा वसमार, ता.साक्री | श्री. महेश प्रमोद भामरे | ६ |
| ३) | **वैष्णवीची समावेशनाकडे वाटचाल** | जि.प. शाळा वाडीभोकर नं. २, ता.धुळे | श्रीमती नम्रता प्रल्हाद सोनवणे | ८ |
| ४) | **शाळेत रमणारा अक्षय** | जि.प.शाळा रतनपुरा, ता.धुळे | श्री. कैलास राजेंद्र देवरे | १० |
| ५) | **प्रणवची शैक्षणिक प्रगती** | जि.प. शाळा अर्थे खु., ता.शिरपूर | श्री. मोतीलाल सिताराम पाटील | १२ |
| ६) | **शिक्षणाच्या दिशेने जाकीरने घेतली भरारी** | म.न.पा.शाळा क्र.२०, धुळे | श्रीमती संजीवनी भरत पाटील | १३ |
| ७) | **अन् वैभव बोलू लागला** | जयहिंद हायस्कुल, धुळे | सौ. शुभांगी शेखर बनछोड | १५ |
| ८) | **नविदचा शाळेकडे प्रवास** | म.न.पा.शाळा क्र.१०,धुळे | श्रीमती.जरीनाबहेन अहमदशाह फकीर | १७ |

# प्रस्तावना

नमस्कार,

समावेशक शिक्षणासाठी शाळांमध्ये प्रसंगी घरी जावून आमचे जिल्हा समन्वयक, विशेष तज्ञ, विशेष शिक्षक दिव्यांग विद्यार्थी शिकविण्यासाठी वर्ग शिक्षक, पालकांना मदत करीत असतात.

जेव्हा दिव्यांग विद्यार्थ्यांची सर्वेक्षणावेळी गृहभेट होते. तिथपासून शाळा प्रवेश अध्ययन शैलीनिहाय शिकण्याच्या प्रक्रियेत वरील सगळ्यांना कसरत करावी लागते. वाट अवघड असली तरी शाळेच्या आधार घेत ती सोपी होते. पुढे तेच दिव्यांग मुल काही तरी करण्याच्या, शिकण्याच्या धडपडीमध्ये सहभागी होते. हा प्रवास रोमांचकारी असतो. त्या प्रवासातील अनुभव इतर शिक्षणातील घटकांना प्रेरणादायी ठरावेत. या दृष्टीने पुस्तिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे.

प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्याचे अनुभव त्याची कथा होते. कथेचा शेवट मात्र सुखावणारा, गोड होतो. अशा दिव्यांग विद्यार्थ्याला वाट शोधण्यासाठी प्रोत्साहन मिळणे हा पुस्तिकेमागील उद्देश आहे. समावेशित वर्गाच्या धडपडीत हे पुस्तक आधार देणार, असा नक्की विश्वास वाटतो.

पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा !
धन्यवाद !

**डॉ.मंजुषा क्षीरसागर**

प्राचार्य
जिल्हा व प्रशिक्षण संस्था, धुळे

## ॥ दिव्यांग यशोगाथा ॥

# शेखरचे पहिले पाऊल



**शेखर सुरज भिल**
**जि.प.शाळा सोनगीर नं.४,**
**इयत्ता-६ वी**
**प्रवर्ग-बहुविकलांग**

बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकारामुळे सर्व बालकांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. त्यातूनच समावेशित शिक्षणाची संकल्पना पुढे आली. समावेशक शिक्षण म्हणजे सर्वांसाठीचे शिक्षण. ज्यामध्ये सर्व विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत समान सहभागी होतात. समावेशक शिक्षण घेत असतांना काही दिव्यांग विद्यार्थी असे असतात की, त्यांच्या काही अवयवांच्या अकार्यक्षमतेमुळे सर्वाबरोबर ते शाळेत येवू शकत नाहीत. पर्यायाने घरीच झोपून राहतात. एक विशेष शिक्षिका म्हणून जेव्हा असं मुल डोळ्यासमोर येतं तेव्हा माझी ओढ त्याला घरापासून शाळेत आणणे हीच असते हेच दिव्यांग मूल पालकांच्या डॉक्टरांच्या वर्गशिक्षकांच्या व विशेष शिक्षकांच्या मदतीने शाळेत येण्यास सक्षम बनते तेव्हा ती एक यशस्वी गाथा तयार होते. अशी एक यशोगाथा माझ्या शेखरची आहे.

शेखर, आई, आजी-आजोबा यांच्या सोबत एकत्र कुटुंबात राहणारा मुलगा आहे. शेतमजुरी करून उदरनिर्वाह भागवणारे हे कुटुंब आहे. शेखरच्या कुटुंबात कोणीही दिव्यांग नव्हते असे पालकाच्या चर्चेअंती समजले. मग शेखरला दिव्यांगत्व येण्याचे नेमके कारण काय ? असा प्रश्न मला पडला. त्याचे उत्तर पालकांच्या बोलण्यातून लक्षात आले. शेखर १ वर्षाचा असतांना तापाचा तीव्र झटका आल्याने दिव्यांगत्व आले. मेंदूचा पक्षाघात व मध्यम स्वरूपाचे मतीमंदत्वामुळे शेखरला बऱ्याच क्रिया करणे अवघड जावू लागले.

१) स्वत:च्या पायावर उभे राहणे

२) स्पष्ट बोलणे

३) वस्तुंची पकड चांगली करणे.

४) सुक्ष्म व ढोबळकारक विकास करणे.

५) सुचनांचे आकलन लवकर न होणे.

६) सु-शी वर नियंत्रण नसणे.

७) आत्मविश्वासाची कमतरता.

शेखरच्या समस्या आता माझी आव्हाने झालेल्या होत्या. मग मी निर्णय घेतला त्याला स्वावलंबी करून सक्षमतेकडे नेण्याचा!

अन् शेखरचा कुटूंबापासून शाळेचा प्रवास सुरू झाला.शेखरची आणि माझी सोनगीरच्या अंगणवाडीत भेट झाली. अंगणवाडीत असतांना शेखरचा एकच नित्यनियम होता. तो आईच्या कडेवर बसून अंगणवाडीत जाणे आणि खाऊ घेतला की, ताबडतोब घरी जाणे. तब्बल तीन वर्षे अंगणवाडीमध्ये शेखर खाऊ घ्यायचा आणि खाली मान घालून घरी जायचा. बघता, बघता शेखर सहा वर्षांचा पूर्ण झाला. आता मात्र घरच्या ओट्यावर थोडस बसत असतांना मुलं गल्लीतून शाळेत जात होते हे शेखर बघत होता. परंतु आपल्या दिव्यांगत्वामुळे ही बाब तो आईला सांगू शकत नसे. म्हणून तो शाळेच दप्तर आईपुढे आपटायचा आणि खुणवून सांगायचा. त्याच्या खुणांची भाषा आईच्या लक्षात आली. त्याची ही कृती शेखरच्या आईने मला सांगितली. मग आईचे समुपदेशन करून मी शेखरचा प्रवेश जि.प.शाळा सोनगीर नं.४ मध्ये केला.

आता शेखरचे अध्ययन व माझे अध्यापन याचा प्रवास सुरू झाला. सुरूवातीला शेखरच्या आवश्यक असणाऱ्या सर्व प्राथमिक गरजा बाजूला केल्या. त्यातून काही कौशल्याची निवड केली.

**वैयक्तिक कौशल्ये -**

१) आधाराशिवाय उभे राहणे.

२) बोटांची ग्रीप पक्की करणे.

## ।। दिव्यांग यशोगाथा ।।

शेखरची शाळेत येण्याची गोडी पाहता. शेखरला सर्व सामान्य मुलांबरोबर शाळेत वावरता यावे असे मला वाटू लागले. शेखरला आधाराशिवाय उभे करण्यासाठी पहिले मला फिजिओथेरपी वर भर देणे गरजेचे वाटते. थेरेपी म्हणजे स्नायुंमधील ताठरता कमी करण्यासाठी व स्नायुमध्ये ताकद येण्यासाठी केलेले छोटे-छोटे व्यायाम होय. उदा- उभे राहणेसाठी- वाळूत चालणे.

हाताच्या ग्रीपसाठी - स्माईल बॉल प्रेस करणे.
रांगोळी मुठीत पकडणे इ.

असे व्यायाम आईबरोबर मी पण शिकले. शेखरला रोलेटरवरची ग्रीप पक्की करण्यासाठी रोलेटरच्या हॅण्डलवर कापड गुंडाळून ते जाड केले. यालाच ॲडॅपटेशन डिव्हाईस (Adaption Device) असे म्हणता.

शेखर आईच्या कडेवर शाळेत यायचा. शाळेत बसायचा आणि आईसुद्धा त्यांच्या बरोबर शाळेत थांबायची. आता शेखरचे थेरेपी बऱ्यापैकी चालू असतांना त्याच्या पायाला कॅलिपरच लावून पाऊल उचलण्यासाठी मी त्याच्यांकडून अनेक वेळा सराव करुन घेतला. सरावाने शेखरला पाय उचलण्याची सवय लागली. पाय उचलतांनाचा आनंद माझ्यापेक्षा शेखरच्या चेहऱ्यावर मला जास्त दिसू लागला आणि कळत-नकळत माझा आणि त्याचा आत्मविश्वास वाढला.

दोघांच्या आत्मविश्वासामुळे शेखरला हातात रोलेअर मी बिनधास्तपणे दिले. पायाच्या कॅलिपरसाठी जितका सराव मला शेखरला द्यावा लागला तितका हाताच्या रोलेटरसाठी लागला नाही. पण तुलनेने शेखरच्या लक्षात आले की मला हेही शिकावे लागणार आहे. रोलेटरमुळे शेखरला वर्गमित्र मिळाले. वर्गातील मुले घरी धावत जावून त्याला घेवून येवू लागले. शेखर मित्रांबरोबर जात असतांनाचा आनंद आईच्या डोळ्यात लपला नाही.

आता मला शेखरचा रोलेटरचा आधार कमी करायचाय. त्यासाठी मी खेळ घेतले.

उदा- शेखरपासून थोड्या अंतरावर मित्राला उभे केले. मित्रा जवळ बॉल दिला आणि शेखरने चालत जावून तो घ्यायचा. परत जागेवर यायचे, असा खेळ घेतला. यासाठी थोड्या प्रमाणात शारीरिक मदत देवून सराव केला.

कदाचित मी लिहीत असतांना तुम्हाला हा चमत्कार वाटेल पण हा चमत्कार नसून हे सत्य आहे की शेखर स्वतःच्या दोन्ही पायावर कुणाचाही आधार न घेता आज शाळेत येतो. न्यूनगंडाचा शेखरचा कुठलाही संबंध आता दिसत नाही. दिसतो तो फक्त त्याच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास !

पालक, वर्गशिक्षक, विशेष शिक्षक आणि शेखरची प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर हे घडू शकते.

माझा व शेखरचा हा प्रवास फक्त चालण्यापूरता मर्यादित नसून पुढे शैक्षणिकदृष्ट्या साक्षर करण्याच्या दिशेने चालूच राहणार.

***श्रीमती. नेहा अशोक जाधव***
*विशेष शिक्षक*
*ग.सा.के.धुळे*



# '' तिच्या अथक प्रयत्नांना यश''



**कु. दिव्यांनी भाऊसाहेब जाधव**
**जि.प. वसमार, ता. साक्री**
**इयत्ता-४ थी**
**प्रवर्ग - सेरेब्रल पाल्सी**

या जन्मावर या जीवनावर खूप प्रेम करावे. मी जीवनावर म्हटलो कारण जीवन खूप सुंदर आहे आणि महत्त्वपूर्णही तुमच्यासाठी, आमच्यासाठी आणि सर्वांसाठी जीवनात अडचणी त्यांनाच येतात. जी व्यक्ती जबाबदारी उचलायला तयार असते. आणि जबाबदारी घेणारे कधी हारत नाही. ते जिंकतात आणि शिकतात. जीवन कोणासाठी थांबत नाही फक्त जीवन जगण्याची कारणं बदलतात. अशाच बदलत्या कारणाबरोबर जीवनाशी दोन हात करत जगणारे कुटुंब म्हणजे श्री.भाऊसाहेब जाधव यांचे साक्री तालुक्यातील वसमार या गावातील एक कुटुंब. मोलमजुरी करून उदरनिर्वाह भागवणारे. यांच्या कुटुंबात बऱ्याच वर्षांनी एक मुलगी जन्माला आली ती जन्मतः दिव्यांगत्व घेवून. दिव्यांग मूल जन्माला आल्याने त्याच्या जीवनात संघर्षाला सुरूवात झाली.

सर्वेक्षणाच्या निमित्ताने मी दिव्यांनीच्या घरी पोहोचलो व तिथे तिची आणि माझी सर्वप्रथम भेट झाली. वाढीच्या टप्प्यानुसार दिव्यांनीची शारीरिक, मानसिक, बौद्धिक वाढ मागासलेली होती त्यामुळे आई-वडिलांचे खचलेले मनोबल माझ्या दृष्टीतून लपले नाही. एक विशेष शिक्षक म्हणून दिव्यांनीला स्वावलंबी बनवून तिच्या पालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद परत आणण्याचे मी ठरवले!

दिव्यांनी अंगणवाडीत दाखल असूनही ती घरीच असायची. दिव्यांनी बहु विकलांग असल्याने तिच्या कमरेपासून खाली दोन्ही पायात उभे राहण्याइतकी ताकद नव्हती. ती सतत पाठ टेकून बसून राहत असे. दिव्यांनीच्या सततच्या सहवासाने तिच्या गरजा व मर्यादा लक्षात घेवून मला तिला दोन्ही पायावर उभे करणे महत्त्वाचे वाटू लागले. तिच्या समस्या मी आव्हाने म्हणून स्वीकारल्या !

वैयक्तिक कौशल्ये   १) आधाराने उभे राहणे

या कौशल्यासाठी दिव्यांनीला सक्षम बनवायचे होते. एक विशेष शिक्षक म्हणून पालकांशी चर्चेअंती तिच्या कौशल्याचा प्राधान्यक्रम ठरवला. आता दिव्यांनीला आधाराने उभे राहता यावे यासाठी प्रत्यक्ष कृतीतून फिजियोथेरपी म्हणजे स्नायूंमधील ताठरता कमी करण्यासाठी व स्नायूंमध्ये ताकद येण्यासाठी केले जाणारे छोटे-छोटे व्यायाम तिच्या पालकांना समजावले. समावेशित शिक्षणांतर्गत होणाऱ्या थेरपी कॅम्पचा लाभ मिळवून दिला. रोज थेरपीचा सराव चालू असतानाच मोजमाप शिबिरामार्फत दिव्यांनीला कॅलिपर हे साहित्य मिळाले. त्याचा खूप मोठा आधार दिव्यांनीला उभे करण्यासाठी झाला. कॅलिपरचा वापर प्रत्यक्ष कृतीतून आईला सांगितला. कॅलिपरच्या वापरामुळे दिव्यांनीला गुडघ्याला व पायाच्या पंज्याला खूप मोठा आधार होवून पाय उचलणे सुलभ झाले. त्यामुळे घरी आईनेही त्याचा सतत वापर चालू ठेवला. तिचे प्रत्येक पाऊल, मला व आईला नवीन प्रेरणा देत होते. त्यामुळे दिव्यांनी बरोबर आमचाही आत्मविश्वास वाढू लागला.

आमच्या वाढत्या आत्मविश्वासाला पाठबळ म्हणून मी तिच्या अंगणवाडी ताईची मदत घेतली. शारीरिक आधाराने अंगणवाडीत आणून बसवायला सुरूवात केली. समवयस्क मुलांमध्ये मिसळण्याचा तिचा आनंद ओसंडून वाहू लागला. बऱ्याच सरावाने शारीरिक आधार कमी होवून फक्त कॅलिपरच्या आधाराने ती अंगणवाडीत येवू लागली. तिच्या वर्गातील उत्स्फूर्त प्रतिसाद आम्हाला नवीन गोष्ट शिकवण्याचे बळ देवू लागला.

# ।। दिव्यांग यशोगाथा ।।

घरी एकटीच बसणारी दिव्यांनी समवयस्क मुलांमध्ये कधी व कशी रमु लागली हे मला व तिच्या आईला कळलेच नाही. यासाठी आम्हाला तिच्या अंगणवाडी ताईची खूप मदत झाली. त्याचे शीघ्र हस्तक्षेप (Early Intervention Training) चे ट्रेनिंग झालेले असल्याने त्यांनी तिला योग्य शै.साहित्य, थेरपी, खेळातून मनोरंजन कौशल्य तिच्या कलेने घेवून तिला सहभागी क़रून शिकवले.

आता दिव्यांनी एकही दिवस घरी न राहता कॅलिपरच्या सहाय्याने रोज अंगणवाडीत येवू लागली. तिचे रोज अंगणवाडीत येणे व इतर मुलांबरोबर मिसळणे हे बघून तिच्या पालकाचे आनंदाश्रु वाहू लागले. दिव्यांग व्यक्ती नसतात तर दिव्यांग ह्या समाजाच्या नजरा असतात. हे पालकांना दिव्यांनीच्या प्रगतीवरुन वाटू लागले. प्रयत्नांना यश म्हणून दिव्यांनी पहिल्या इयत्तेत जि.प.शाळेत दाखल होणार होती. ती शाळेत स्वत:च्या पायाने कॅलिपरच्या मदतीने शाळेत येवू लागली. संपूर्ण आत्मविश्वासाने देवयानीने १ ली इयत्तीत पाऊल टाकले होते. याचा आनंद पालकांच्या चेहऱ्यावरही झळकत होता. आमची मुलगी कधी चालू शकेल अशी आशा सोडून दिलेली आई आता समाधान व्यक्त करु लागली होती.

माझा आणि देवयानीचा शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रवास पुढे चालू रहाणार.

धन्यवाद!

***महेश प्रमोद भामरे***

*विशेष शिक्षक*

*ग.सा.के.साक्री*



# '' वैष्णवीची समावेशनाकडे वाटचाल''



**वैष्णवी जितेंद्र भामरे**
**जि.प. शाळा वाडीभोकर नं.२**
**इयत्ता- ३ री**
**प्रवर्ग- बहुविकलांग**

बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यामुळे सर्व बालके शाळेत येवू लागली आणि सोबतच दिव्यांग मुलेही या कायद्यामुळे सामान्य शाळेत येवू लागली. मी विशेष शिक्षिका म्हणून या दिव्यांग मुलांसाठी काम करते. 'वैष्णवी' इ.३री मध्ये शिकणारी दिव्यांग मुलगी. जीची भेट जि.प.शाळा वाडीभोकर नं.२ या ठिकाणी झाली. खरे पाहता, पूर्णपणे आईवर अवलंबून असणाऱ्या वैष्णवीची प्रगती करण्याचे मी ठरवलं !

वैष्णवी विभक्त कुटुंबात राहणारी बहुविकलांग मुलगी. आई,वडील, भाऊ व वैष्णवी असे कुटुंबात सदस्य आहे. वडील मजुरी करतात तर, आई गृहिणी आहे. आई-वडीलांचे माध्यमिक शिक्षण पूर्ण झालेले आहे. वैष्णवीच्या जन्माच्या वेळी नाळ कापतांना चूक झाली आणि तिला दिव्यांगत्व आले. वैष्णवीच्या कुटुंबात आधी कोणीही दिव्यांग नव्हते. त्यामुळे तिचे पालक खूपच निराश होते.

या नैराश्याची छबी वैष्णवीच्या प्रगतीवर पडू नये यासाठी तिला मी जि.प.शाळा वाडीभोकर नं.२ मध्ये इ.१ली मध्ये दाखल केले. पण ती घरीच असायची, सतत आईच्या सहवासात असल्याने ती शाळेत येण्यास घाबरायची, तिच्यात न्यूनगंडाची भावना होती. ती समवयस्कांमध्ये मिसळत नव्हती.

वैष्णवीला सेरेब्रल पाल्सी, सौम्य मतिमंदत्व व वाचादोष असे एका पेक्षा जास्त दिव्यांगत्व होते. वैष्णवीच्या दोन्ही हात आणि दोन्ही पायात ताकद नव्हती. इतकेच नाही तर बोलण्यातही स्पष्टता नव्हती.शारीरिक अवयव सक्षम नसल्याने वैष्णवी सतत झोपूनच राहत असे.

वैष्णवीच्या वारंवार भेटीनंतर तिच्या क्षमता, गरजा व मर्यादा लक्षात घेवून तिला स्वावलंबी करणे महत्त्वाचे होते.

यासाठी मी निश्चय केला की,

| | |
|---|---|
| **वैयक्तिक कौशल्ये** | १) वैष्णवीने आधाराने उभे राहणे व चालणे. |
| | २) शी-सू वर कंट्रोल करणे व सांगणे. |
| **सामाजिक कौशल्ये** | १) आई शिवाय इतरांना प्रतिसाद देणे.<br>२) समवयस्कांमध्ये मिसळणे. |

या कौशल्यासाठी तिला मदत करायची होती. एक विशेष शिक्षिका म्हणून माझे पहिले पाऊल म्हणून मी पालकांशी चर्चा केली. पालकांना तिच्या वैयक्तिक व सामाजिक कौशल्याचा प्राधान्यक्रम समजवला.

वैष्णवीच्या पायात ताकद यावी यासाठी समावेशित शिक्षणांतर्गत होणाऱ्या थेरेपी कॅम्पचा लाभ मिळवून दिला. या थेरेपी कॅम्पमध्ये स्नायुंची ताकद मिळविण्यासाठीचे व्यायाम शिकवले जातात. वैष्णवीला पायासाठी जास्त व्यायाम देण्याची गरज होती आणि तिच्या स्नायुमध्ये ताकद आली की ती चालू शकणार होती. त्यामुळे डॉक्टरांकडे मी आणि तिच्या आईने हे स्नायुंच्या ताकद येण्यासाठीचे व्यायाम शिकलो जसे की, १) तिला बॅलन्स करता यावा म्हणून थेरेपी बॉलवरचे व्यायाम २) वाळूमध्ये उभे राहण्याचे व्यायाम ३) लाकडी भूस्यामध्ये उभे करणे इ. घरी वैष्णवीला व्यायाम व मसाज करण्याचा सराव मी आणि आईने सुरू ठेवला. यालाच जोड म्हणून अलिम्को शिबिरातून मिळालेल्या 'कॅलिपर' या साहित्यासाठी वापर करण्यास सुरूवात केली. वैष्णवीच्या आईला कॅलिपरचा वापर प्रत्यक्ष कसा करावा हे दाखवले. कॅलिपरच्या वापराने वैष्णवीला गुडघ्याला व घोट्याला आधार मिळेल. उभे राहण्यासाठी व पाय

उचलून टाकण्यासाठी मदत होईल. असा फायदा आईला सांगितला. त्यामुळे आईने वैष्णवीला कॅलिपर वापराची सवय केली.

सोबतच वैष्णवीला शी-सु कंट्रोल करणे ही महत्त्वाचे होते. पण यासाठी मला खूप मेहनत घेण्याची गरज पडली नाही. वैष्णवीच्या आईने व मी दर २०-२५ मिनिटांनी तिला टॉयलेट जवळ नेले. काही ठराविक काळाने या वेळेत वाढ केली. या सवयीमुळे तिला कळले की या विशिष्ट ठिकाणी शी-सू साठी जावे लागते. याबरोबरच वैष्णवीच्या 'शी-सु' हे शब्द बोलण्याचे शिकवले.

आई शिवाय इतर कोणालाही प्रतिसाद न देणारी वैष्णवी सुरुवातीस मलाही प्रतिसाद देत नसे. मग मी तिच्याशी गप्पा सुरु केल्या. तिच्या आवडीचे चॉकलेट, चिप्स देवून तिच्याशी मैत्री केली. आई व घरातील इतरांशी चर्चा केली की वैष्णवीची सर्वच कामे आईने न करता काही कामे इतरांनी करावी जसे, वडिलांनी तीचे केस विंचरणे, भाऊने कधी तिला खावू घालणे इ. यामुळे वैष्णवीचा माझ्याशी व घरातील इतरांशी संपर्क वाढला. ती आता इतरांना प्रतिसाद देते.

पण आता वैष्णवी शाळेत येण्यास घाबरते हे लक्षात आल्यावर, मी आईला तिच्या सोबत शाळेत बसण्याची परवानगी मुख्याध्यापकांकडून मिळवून दिली. सौ. वर्षा मॅडम वैष्णवीच्या वर्गशिक्षिकां यांचीही साथ मला मिळाली.

वर्गातील समवयस्क मुलींना वर्षा मॅडमांनी वैष्णवीची खूप छान ओळख करून दिली. ''ही तुमची नवीन मैत्रीण! तीचं नाव वैष्णवी आहे. ती तुमच्या सोबत आता वर्गात बसणार!'' वैष्णवीचा वर्गात कृतीयुक्त सहभाग होण्यासाठी वर्षा मॅडमांनी छोटी गाणी व खेळ घेतले.

**गाणं-** अंगठ्याला अंगठा, तर्जनीला तर्जनी, मध्यमेला
मध्यागा, अनामिकेला अनामिका, करंगळीला करंगळी,
दोन्ही हाताचा जोड झाला, पहिला नमस्कार देवाला.'

माझ्या या प्रयत्नांना आता वैष्णवी इ. ३ रीत असतांना यश आले आहे. वैष्णवी आता आधाराने उभी राहते, चालते. वैष्णवीच्या शी-सू वर नियंत्रण (कंट्रोल) आला आहे. ती बोलून सांगण्याचा प्रयत्न करते. वैष्णवी आता आई शिवाय मला, वर्गशिक्षिकेला, वर्गातील मैत्रीणींना प्रतिसाद देते.

वैष्णवीचे अस्पष्ट, तोडके-मोडके शब्द समजत नव्हते तरी तिच्या डोळ्यांच्या भावातून मला कळले, ती मला म्हणाली, ''मॅडम, माझ्या वाढदिवसाला या!'' हे तिचे बोलवणे माझ्यासाठी जग जिंकण्यापेक्षा कमी नव्हते.

माझा आणि वैष्णवीचा हा प्रवास फक्त समावेशित वर्गापर्यंत मर्यादित नसून तो असाच पुढे चालू राहणार. आता वैष्णवीला पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान किमान तरी व्हावे यासाठी माझा पुढचा प्रवास आणि प्रयत्न चालू राहणार !

धन्यवाद !

***श्रीमती नम्रता प्रल्हाद सोनवणे***
*विशेष शिक्षक*
*ग.सा.के.धुळे.*



# 'शाळेत रमणारा अक्षय'



**अक्षय श्रावण वाकळे**
**जि.प. शाळा रतनपुरा**
**इयत्ता- २ वी**
**प्रवर्ग- सेरेब्रल पाल्सी**

जीवन जगत असतांना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याची वेगळीच मजा असते. वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देत असतांना काही वेळा आपण खचतो. त्यावेळी समाजातील किंवा सभोवताली असणारी काही माणसं जगण्याचा अर्थ शिकवून जातात. एखादा माणूस शुन्यातून वर येतो तर एखादा माणूस आपल्याजवळील अक्षमतेला दूर करुन समताधिष्ठित होतो. समाजात वावरत असतांना काही लोक सर्व काही असूनही दिव्यांग असतात, तर काही लोक शरीराच्या एखाद्या अवयवात क्षती असून देखील परिपूर्णतेच्या पलीकडे असतात. याचे उदाहरण लक्षात घेऊन मी समावेशित शिक्षणामध्ये विशेष शिक्षक म्हणून काम करत असतांना माझ्या हातून एका दिव्यांग बालकाच्या विकासासाठी केलेला हा एक छोटासा प्रयत्न...!

सप्टेंबर २०२१ मध्ये बोरकुंड केंद्र कार्यक्षेत्र म्हणून मला मिळालं. बोरकुंड केंद्रातील एक गाव रतनपुरा. रुजू झाल्यावर मी विशेष शिक्षक कैलास देवरे दिव्यांग मुलाची भेट घेत असतांना अक्षय श्रावण वाकळे या दिव्यांग मुलाशी भेट झाली. अस्वच्छ कपडे असलेला, तोंडातून लाळ गाळणारा, विस्कटलेल्या अंथरुणावर पडून असलेला अक्षय मी पाहिला. अतिशय गरीब कुटुंबात राहणारा अक्षय. भावंडात सर्वात लहान. आई मोलमजुरी करते तर वडील बॅन्जो पार्टीत काम करतात. अक्षय सामान्य व सुदृढ बाळ म्हणून जन्माला आला होता. पण काळाने घात केला. सहा महिन्याच्या अक्षयला ताप आला. तापाचे प्रमाण वाढून मेंदूपर्यंत गेले. अक्षयला झटका आला आणि आयुष्यभरासाठी दिव्यांगत्व आले. वाढ व विकासाच्या काळात अक्षय खाटेवर पडला. हलाखीच्या परिस्थितीमुळे पालकांनी हार मानली.

सात वर्षाचा अक्षय पहिलीच्या वर्गात दाखल होता. पण शाळेचा गंध त्याला नव्हता. आता एक विशेष शिक्षक म्हणून मी पालक आणि अक्षय दोघांचेही विकास करण्याचे मनाशी ठरवलं !

गृहभेटी करुन अक्षयच्या निरीक्षणास सुरुवात केली आणि त्याच्या नोंदी घेतल्या. जसे, आईच्या हाताने जेवणं, दैनंदिन क्रिया खाटेवरचं करणं, कोणत्याही प्रकारचे संप्रेषण नाही, यातून मी त्याच्या प्रगतीसाठी काही कौशल्यांची निवड केली.

**⁕ वैयक्तिक कौशल्ये -**

१) रोज अंघोळ करणे.

२) स्वच्छ कपडे घालणे.

३) केस विंचरणे

४) आधाराने चालणे.

**⁕ सामाजिक कौशल्ये -**

१) समवयस्कात मिसळणे.

२) संप्रेषण करण्याचा प्रयत्न करणे.

आता माझ्या गृहभेटी या वाढल्या त्या अक्षयच्या विकासासाठी. आईशी त्याच्या स्वच्छतेबाबत मी चर्चा केली. अक्षयची दररोज अंघोळ करणे हे त्याच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. म्हणून मी अक्षयला खुर्चीत बसवून आईच्या मदतीने अंघोळीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्याला दररोज स्वच्छ कपडे घाला. तेल लावून केस विंचरा, असेही सांगितले. अक्षयच्या तोंडातून नेहमी लाळ गळत होती ती लाळ अंगावर ज्या ठिकाणी पडते तिथे रूमाल बांधून दाखविला आणि रोज असा रुमाल बांधण्याचे आईलाही सांगितले. यालाच जोड म्हणून दर सहा महिन्यांनी होत असणाऱ्या मस्तिष्क आजार या शिबिरास अक्षयची तपासणी झाली. (केली). या शिबिरातून त्याला लाळ गळणे कमी होण्यासाठी आणि झटक्यामुळे बाधित अवयवासाठी औषधोपचार मिळाला.

आता अक्षय आधाराने का असेना पण उभा रहावा यासाठीही माझे प्रयत्न मी सुरू केले. त्याच्या पायातील ताठरता कमी होवून स्नायू बळकट करण्यासाठी छोटे-छोटे व्यायाम व मॉलिश केली. जसे की अक्षयच्या पायाखाली पाण्याने भरलेल्या बाटलीने रोलिंग केले. थोडावेळ आधाराने उभे केले. थेरपी कॅम्पमध्ये डॉक्टरांनी केलेल्या प्रेशर पॉईटने मसाज केला. अक्षयला अलिम्को कॅम्पमधून रोलेटर व व्हिलचेअर देखील मिळवून दिली.

आता घरीच हे सर्व सुरू असतांना अक्षयचे संप्रेषण कौशल्य व सामाजिक कौशल्य विकास करण्यासाठी त्याला शाळेत आणण्याची मला गरज वाटू लागली. अक्षयचे आई वडील त्याला शाळेत पाठवण्यास तयार नाही. आता मला या ठिकाणी जि.प.शाळा रतनपुरातील शिक्षक श्री.चव्हाण सर यांची खूप मदत झाली. करीक्युलम ट्रान्जॅक्शन (Curriculum transction) चे प्रशिक्षण घेतलेले हे चव्हाण सर, या प्रशिक्षणात दिव्यांग मुलांची ओळख, सेवा-सुविधा, अभ्यासक्रम अनुकुलन, मूल्यमापन, शीघ्र हस्तक्षेपण इ.बाबत सर्व ज्ञान होते. त्यांनी पालकांची भेट घेवून, अक्षय शाळेत आल्यावर त्याची जबाबदारी माझी आणि त्याला मदतनीस भत्त्याचा लाभ मिळेल असे सांगून विश्वासात घेतले. सरांनी मदतनीस भत्ताबाबत शाळा व्यवस्थापन समिती समोर योग्य चर्चा करुन ठराव मान्य करून घेतला. या लाभासाठी मी अक्षयचे आधार कार्ड काढले. अक्षयला युनिक डिसॅब्लिटी कार्डचाही लाभ मिळवून दिला.

डिसेंबर २१ ला आमच्यासाठी आनंदाचा क्षण आला. अक्षयचे शाळेत पहिले पाऊल पडले. आमच्या प्रयत्नांना यश आले. अक्षयला शाळेचे वातावरण आवडू लागले. परंतु दिव्यांगत्वामुळे त्याला जास्त वेळ शाळेत बसता येईना! अक्षय आधाराने चालण्याचा प्रयत्न करतो. मदतनीसाच्या मदतीने तो आठवड्यातून २-३ दिवस शाळेत येतो. समवयस्क मुलांमध्ये संप्रेषण करण्याचा प्रयत्न करतो.

पहिल्या भेटीत अनोळखी वाटणारे विशेष शिक्षकांना आता अक्षय सर, सर ! म्हणून आवाज देतो. दिव्यांग जागरुकता सप्ताहमध्ये तो मदतीने खेळात सहभागी होतो. अक्षयला असे पाहून माझा आनंद गगनात मावेना!

अक्षयच्या या प्रगती बाबत पालकांची प्रतिक्रिया अशी की, ''सर, अक्षय शिकला नाही तरी चालेल पण त्याला शाळा सोडू देवू नका कारण जेव्हापासून त्याला शाळा आणि मित्र मिळाले तेव्हापासून तो आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले!'' (अहिराणीत)

आता अक्षय आणि मी इथेच थांबणार नाही जरी पालक म्हटले की अक्षय शिकला नाही तरी चालेल पण मी अक्षयला किमान गणिती कौशल्य व भाषा कौशल्य शिकवण्याच्या प्रयत्नात सतत असेल !


धन्यवाद !

***श्री. कैलास राजेंद्र देवरे***
*विशेष शिक्षक*
*ग.सा.के.धुळे.*



## ॥ दिव्यांग यशोगाथा ॥

# प्रणवची शैक्षणिक प्रगती



**प्रणव गोपाल पाटील**
**जि.प. शाळा अर्थे खु.**
**इयत्ता- १ ली**
**प्रवर्ग- स्वमग्र (Autism)**

प्रणवचा प्रेरणादायी थक्क करणारा प्रवास लिहितांना मला आनंद होत आहे. प्रणवची माझी भेट अर्थे गावाचे दिव्यांग विद्यार्थी सर्वेक्षण करतांना झाली. प्रणव स्वमग्र (Autism) या दिव्यांगत्वाने ग्रासला होता.

स्वमग्र दिव्यांग प्रकारात मूल एकाच गोष्टीची पुनरावृत्ती करतात जसे की सतत हात हलविणे, मान गोल फिरवणे, स्वत:च्या हातांना चावणे, सतत इकडे तिकडे फिरणे, कोणत्याही व्यक्तीच्या डोळ्यात डोळे घालून पाहत व बोलत नाही, खूप हट्टी असतात, जेवणात एकाच प्रकारचे जेवण आवडते, कोरडे उदा. पोहे, चिवडा, बिस्कीट, कोरडी पोळी, किंवा मऊ दहीभात, खिचडी, भात, भाजी पोळी.

स्वमग्रतेची बरीच लक्षणे प्रणवच्या घरच्यांना लक्षात आली. प्रणवला सांभाळणे पालकांना अवघड झाले होते. कारण प्रणव गावात, गल्लीत सतत फिरत राहायचा. परिणामी पालक त्याला घरात खुर्चीला, खांबाला, पलंगाला बांधून ठेवत व शेतीच्या कामाला जात होते. प्रणवला आजी,आजोबा सांभाळत. प्रणवला लहान भाऊ आहे. घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे.

सततच्या गृहभेटीतून पालकांची व अंगणवाडी ताईशी मैत्री झाली. प्रणवला वयाच्या तिसऱ्या वर्षी अंगणवाडीत दाखल केले. तो अंगणवाडीत येत नव्हता परिवाराच्या मदतीने प्रणवला अंगणवाडीपर्यंत येण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अंगणवाडीत जायचा व पोषण आहार घेऊन परत यायचा. अंगणवाडीत जाणारा प्रणव सुरुवातीला १५ मिनीटं थांबू लागला. हा प्रवास सुरू असतांना त्याचा विकास करण्यासाठी वैयक्तिक शैक्षणिक आराखडा तयार करण्यास मी सुरूवात केली.

१) प्रणवच्या वैयक्तिक गरजेनुसार आपल्या कुटुंबाचा विश्वास परत येण्यासाठी त्याचे नाव घेऊन व स्पर्शाने सूचना देण्यास मी व कुटूंबाने सुरूवात केली.

२) रंगीत आकर्षित आकारचे मनोरे रचणे व काढणे तसेच कागदाचे गोळे करणे या कृती करण्यासाठी वारंवार प्रणवला त्याच्या नावाने आवाज देवून नजरेला नजर देण्याची व बोलत करण्याची सवय लावली.

३) प्रणवला रुमालाची, कागदाची घडी घालणे,रंगकाम, हाताचे ठसे उमटवणे, अशा कृती पालकांच्या मदतीने करवून घेतल्या, याचे फलीत म्हणजे प्रणव सूचनांकडे थोडे लक्ष देऊ लागला. परिणामी तो अंगणवाडीत थोडा वेळ बसू लागला. मुलांच्या बरोबर रिंगणात उभा राहायचा त्याचे नाव पुकारल्यावर बाईंकडे पाहायचा. तो स्वत:च्या नावाचा सुद्धा तो उच्चार करण्याचा प्रयत्न करू लागला. घरच्या सदस्यांना ओळखतो. त्यांच्याकडे पाहुन हसतो आता मलाही खूप आनंद होतो. नवीन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ला जिल्हा परिषद शाळा अर्थे येथे इयत्ता १लीत दाखल केले. त्याच्या वर्ग शिक्षिकेचे अभ्यासक अनुकूलन हे पाच दिवसाचे प्रशिक्षण झाले आहे. यात दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना कसा बदल करता येईल दिव्यांग प्रवर्गानिहाय हे मार्गदर्शनपर प्रशिक्षण झाले आहे. प्रशिक्षणाचा कायदा प्रणवच्या प्रगतीसाठी होत आहे. प्रणव वर्गातील मुलांबरोबर अध्ययन,अध्यापन प्रक्रियेत २ ते ३ तास सहभागी होता. त्यांच्या सोबत क्रिडागंणात खेळ खेळतो कुटुंबाला व मला त्याच्या यशाबद्दल आनंद होत आहे.

अजूनही विशेष शिक्षक म्हणून मोतीलाल पाटील प्रणवच्या पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी सोबत आहे.

***श्री.मोतीलाल सिताराम पाटील***
*विशेष शिक्षक*
*ग.सा.के. शिरपूर*

# शिक्षणाच्या दिशेने जाकीरने घेतली भरारी



**जाकीर गफ्फार धोबी**
**म.न.पा. शाळा क्र.२०.**
**इयत्ता- ५ वी**
**प्रवर्ग- बहुविकलांग**

समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत, शिक्षणाचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्टे मुलांचा सर्वांगीण विकास आहे. प्रत्येक मूल शाळेपर्यंत आणण्यासाठी आम्हा सर्व विशेष शिक्षकांची धडपड सुरू असते. या धडपडीच्या निमित्तानेच शाळाभेटी करत असतांना जाकीरचे पालक अॅडमिशनकरिता मुख्यध्यापकांना भेटण्यासाठी आलेले दिसले. त्यावेळी जाकीरसह त्याच्या आईशी मुख्याध्यापकांनी माझी भेट घालून दिली.

जाकीरच्या आईशी झालेल्या चर्चेवरून लक्षात आले की, तो बेडवर झोपून असायचा. अनोळखी व्यक्तींच्या स्पर्शाने त्याला वेदना व्हायच्या. फक्त आईचाच स्पर्श त्याला जवळचा वाटे. त्याला बोलणे सर्व समजते. प्रश्न विचारल्यावर तो प्रतिसाद देखील देतो. ही जमेची बाजू जाकीरच्या आईने मला सांगितली. मी त्याला भेटून केस हिस्ट्री जाणून घेतली. जन्माच्या वेळी जाकीरला कुठलेही दिव्यांगत्व नव्हते. सहा महिन्याचे बाळ झाल्यावर त्याच्या अंगावर त्याची चार वर्षांची बहीण खेळतांना पडली. त्यामुळे त्याला दिव्यांगत्व प्राप्त झाल्याचे कळाले.

आता मी जाकीरच्या प्रगतीसाठी वाटचाल सुरू केली म.न.पा. शाळा क्र.२० भंगार बाजार या ठिकाणी वयानुरूप इ.३री, मध्ये त्याला दाखल केले. शाळेत आल्यानंतर ३ री च्या वर्गात टाळ्यांच्या गजरात मुलांनी जाकीरचे स्वागत केले. तो क्षण जाकीरचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी उपयोगी पडला.

जाकीर बहुअध्ययन शैलीतील मुलगा आहे. त्यांच्या सर्व क्रिया झोपून होत्या. बसण्याची अजिबात ताकद त्यांच्यात नव्हती. तरी देखील शिक्षणाची आवड असल्याने जाकीरचा रोज शाळेत येण्यासाठी आग्रह होता. मी जाकीरची शिकण्याची धडपड बघून वर्गशिक्षिका आसेफा मॅडम यांना जाकीर विषयी कल्पना दिली. शिक्षणाविषयीची आवड त्याला समजून घेण्यात येणाऱ्या अडचणी त्यांची जीवनशैली, अवयवांची हालचाल कशी होते. तसेच सर्व मुलांसोबत प्रत्येक कृतीत सहभागी करून घेण्यासाठी चर्चा केली. आसेफा मॅडमनी देखील जाकीरला समजून घेण्यासाठी चांगली मदत झाली.

जाकीरच्या वारंवार भेटीनंतर त्यांच्या गरजा, क्षमता, मर्यादा, लक्षात घेवून कौशल्यांची निवड केली.

**वैयक्तिक कौशल्ये** : १) आवश्यक त्यावेळी नाक पुसणे
२) दात घासणे

**शैक्षणिक कौशल्ये** : १) १ ते ५० अंकांची ओळख
२) मुळाक्षरांची ओळख
३) एक अंकी बेरीज, वजाबाकी करणे

**व्यावसायिक कौशल्ये**:१) कागदाचे गोळे तयार करणे
२) कागदाची घडी घालणे

जाकीरचा या कौशल्यांचा विकास करण्यासाठी माझ्या भेटी वाढल्या. वैयक्तिक कौशल्यातील, नाक पुसणे, दात घासणे, यावर आधारित चांगल्या सवयीचे व्हिडीओ जाकीरला दाखवले. समवयस्कांच्या कृतीचे अनुकरण शारीरिक, शाब्दिक, सांकेतिक आधाराचा वापर करून सरावाने जाकीर कौशल्य अवगत करु लागला.

शैक्षणिक कौशल्य विकसनासाठी अंकाची ओळख, अक्षरांची ओळख, बेरीज व वजाबाकी यावर आधारित चित्र, फ्लॅशकार्ड, वस्तू, व्हिडीओ, साहित्य इ. माध्यमांचा वापर करून जाकीरला अंक तोंडी सांगितल्यास तो अंक लिहून दाखवू लागला. एक अंकी बेरजेचे वजाबाकीचे उदा. दिल्यास गोल मांडून लगेच ते उदा. सोडवून दाखवू लागला.

त्याचबरोबर व्यावसायिक कौशल्य विकसनासाठी प्रत्यक्ष कृती करून, समवयस्कांच्या कृतीद्वारे, शारीरिक, शाब्दिक आधाराने, वर्गमित्राच्या अनुकरणाने जाकीर कागदाचे तुकडे करून गोळे तयार करायला शिकला. त्याचसोबत पुढील क्रिया कागदाची

घडीदेखील घालण्यास शिकला. यामुळे तो हस्त-नेत्र समन्वय क्रिया एकावेळी करण्यास शिकला.

जाकीरच्या प्रगतीसाठी माझ्याबरोबर आईने देखील खूप मोलाची भूमिका बजावली. आईने सर्व कृतींचा सराव वारंवार जाकीरकडून करुन घेतला. जाकीरला समजवण्यात काही अडचणी आल्यास मला वेळोवेळी संपर्क केला. प्रसंगी एखाद्या कौशल्यातील अडचण सोडवण्यासाठी मार्गदर्शन घेतले आणि जिकरीने सराव करीत सुधारणा करून घेतली.

आता माझे जाकीरबाबतची छोटे छोटे दृश्ये स्पष्ट आहेत. १) जाकीर छोट्या व्यावहारिक क्रिया करण्यास शिकला. २) स्वतःचा नीटनेटकेपणा राखण्यास शिकला. ३) एका वेळी दोन क्रियांचा समन्वय साधण्यास शिकला. असे प्रयत्न चालू असतांना जाकीर ३ री इयत्तेतून ५ वी इयत्तेत कधी पोहचला ते कळले नाही.

आता खऱ्या अर्थाने आम्हा दोघांचा शिक्षणाचा प्रवास सुरू झाला आहे.

धन्यवाद !

***श्रीमती संजीवनी भरत पाटील***

*विशेष शिक्षक*

*म.न.पा.धुळे*



## ॥ दिव्यांग यशोगाथा ॥

# 'अन् वैभव बोलू लागला'



**वैभव संजय भदाणे**
**जयहिंद हायस्कूल धुळे**
**इयत्ता- १० वी**
**प्रवर्ग- कर्णदोष**

सन २०११-१२ पासून मनपा समावेशित शिक्षण अंतर्गत विशेष शिक्षिका म्हणून कार्य सुरू होते. या प्रवासात दिव्यांग मुलांना कधी शाळेत प्रसंगी घरी दिव्यांग प्रकारानुसार थेरेपी सेवेसह साहित्य साधनांचा लाभ देत अध्यापन केले. यात पालक, विद्यार्थी, वर्ग शिक्षक, आपआपल्या परीने सहकार्य करत होते. तब्बल दोन वर्षानंतर माझ्या अध्यापनाचा गर्व मला होईल असे वैभवमुळे घडले.

एका सर्वेक्षणात माझी आणि वैभवची भेट झाली. वैभव कर्णबधिर आहे हे कुटुंबाकडून कळाले, जमेची बाजू म्हणजे वैभवचे कुटुंब त्याच्या प्रगतीसाठी अनुकूल होते. कारण आई-वडील शिकलेले त्यात वडील 'शिक्षक' होते. सर्वप्रथम त्यांनी वैभवच्या दोन्ही कानाच्या तपासण्या करून त्यात दोन्ही कानास श्रवणयंत्र बसविले. तेथून वैभवचा प्रवास सुरू झाला. या प्रवासात वैभवच्या सोबत त्याचे आई-वडील, बहीण, परिसरातील व्यक्ती आणि मी स्वतः विशेष शिक्षक म्हणून होते.

सुरूवातीला गृहभेटी करुन पालकांशी पुनः पुन्हा संवाद साधला. त्यांच्या मनातील वैभव बाबतची भीती, चिंता कमी केली. वैभवला बालवर्गात प्रवेशित केले. सामान्य मुलांसोबत थोडा वेळ राहिला तर तो अनुकरणाने शिकेल आणि त्याच्या मनातील भीती कमी होईल, असे मला वाटले. याचा परिणाम तो पहिल्या वर्गात गेला. आता मी नियमित त्याच्या शाळेत जाऊ लागले. त्याच्या वर्गशिक्षिका सौ.स्वाती पाटील मॅडम यांच्याशी संवाद साधला. वैभवच्या कर्णबधिर दिव्यांग प्रवर्गाबाबत त्यांना अवगत केले. त्यांना सांगितले की वैभवला पुढे बसवा जेणे करून तुमचा चेहरा त्याला दिसेल व तो तुमच्या ओठांच्या हालचालीवरून भाषा शिकण्यास त्याला मदत होईल. त्यानंतर मॅडमनी वैभवला छान समजून घेत प्रत्येक कृतीत सहभागी करुन घेतले.

आता वैभव, मी, त्याचे आई-बाबा यांच्यासह कौशल्य विकसनसाठी प्रयत्न सुरू केले.

१) श्रवण कौशल्ये.

२) वाचा कौशल्ये.

३) मनोरंजनात्मक कौशल्ये.

४) शैक्षणिक कौशल्ये.

विशेषता त्याच्या आईने वैभवच्या भाषा विकास, वाचा विकास वाढविण्यासाठी मोलाची साथ दिली.

*** श्रवण कौशल्ये :-** श्रवण कौशल्य म्हणजे त्याची ऐकण्याची जी उर्वरीत श्रवण क्षमता आहे तिला उत्तेजित करणे म्हणजे उर्वरित शक्तीचा श्रवणयंत्राच्या आधारे वापर करणे यात

१) श्रवणयंत्र लावून वेगवेगळे आवाज पुढे आणि मागे उभे राहून ऐकविणे.

२) कधी मोठा तर कधी लहान आवाज ऐकविणे.

३) वैभव आवाजाच्या दिशेने पाहातो- का ? त्याचे निरीक्षण नोंदविले.

४) वैभव आवाजाला कसा प्रतिसाद देतो ते तपासले.

*** वाचा कौशल्ये व भाषा कौशल्ये :-** हे दोन्ही कौशल्ये एकमेकांना पूरक आहेत. यात भाषा कौशल्ये म्हणजे अर्थपूर्ण भाषा समजणे. वाचा कौशल्ये या कौशल्ये विकसनासाठी आईने वैभवकडून रोज श्वसनाचे व्यायाम करुन घेतले.

१) नाकाने श्वास घेणे व तोंडाने श्वास सोडणे त्याला शिकविले.

२) एका अंगठ्याने एक नाकपुडी दाबून श्वास घेणे व अंगठा बाजूला करुन श्वास सोडणे. (अनुलोम-विलोम)

**※ वाचा उपचारासाठी किंवा वाचा वाढविण्यासाठी वाक्यंत्रणेचे व्यायाम घेतले जातात, त्या अंतर्गत व्यायाम स्वरुपात खालील कृती करुन घेतल्या.**

१) जीभ तोंडातून आत-बाहेर कर.

२) जीभ बाहेर काढून इकडे-तिकडे फिरव.

३) जीभ तोंडातल्या तोंडात फिरव जसे वरच्या दातावरुन फिरवून खालच्या दातांवर फिरव.

४) जीभ दोन्ही गालांना आतून म्हणजे तोंडातून स्पर्श कर.

५) तोंडात हवा भर म्हणजे गाल फुगव.

६) स्ट्रॉ ने फुंकर मार.

७) ओठांचा चंबू करून ओठ पसर.

वाचा कौशल्य वाढविण्यासाठी आईच्या मदतीने मी केलेले प्रयत्न फळाला येवू लागले. भाषा कौशल्य वाढविण्यासाठी घरातील सर्व वस्तुंना आईने शब्द चिठ्ठ्या लावल्या. जेव्हा जेव्हा ज्या वस्तू विषयी वैभव विचारायचा तेव्हा आम्ही त्याला उच्चार करुन दाखवायचो. सुरूवातीला तो फक्त चेहऱ्याचे निरीक्षण करत होता पण त्याने जिद्द न सोडता उच्चारासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

**मनोरंजनात्मक कौशल्ये :-** वैभवचे शिकणे मनोरंजनात्मक आनंददायी व्हावे म्हणून छोटे-छोटे खेळ घेण्यात आले.

उदा. क्रिकेट, गोलात व गोला बाहेर उडी मारणे, जसे क्रिकेट खेळतांना बॉल, बॅट, झेलणे, फेकणे, मागे-पुढे असे शब्द त्याला कृतीतून ऐकविले. यात वस्तू-शब्द सोबत कृती शब्द अशा कृती केल्या. तसेच बॅट, बॉल यांचे चित्र काढून त्यात रंग भरणे आणि रंगाची नावे उच्चारणे.

**शैक्षणिक कौशल्ये. :** शैक्षणिक कौशल्ये वाढविण्यासाठी लेखनपूर्व तयारी करुन घेतली. त्यासाठी अभ्यासाचे वेळापत्रक आईच्या मदतीने करून घेतले. क्रमाने

१) प्रार्थना २) श्रवणयंत्र तपासणी ३) गप्पा मारणे ४) स्वच्छतेविषयी बोलायला लावणे. ५) तोंडी संभाषण केले. उदा. या, जा, तिकडे जा ६) गोष्ट- नाट्यीकरणातून करायला सांगणे. ७) गाणे- तालबद्ध हालचाली करुन घेणे ८) कागदकाम करायला लावणे ९) चित्र काढायला सांगणे.

हे सर्व करतांना वैभवच्या आईने आणि मी भरपूर चित्रांचा वापर करुन वेगवेगळे अनुभव दिले. वैभवचा शब्दसंग्रह वाढविला. परिणामी त्याला भाषा अर्थपूर्ण समजू लागली. वैभवला भरपूर कृतीत सहभागी करून प्रत्यक्ष अनुभव दिले.

वैभवला प्रत्यक्ष अनुभव देवून शिक्षण दिल्याने कंटाळवाणे झाले नाही. त्याचे मनावरील ओझेही कधी मला जाणवले नाही. आज माझ्या व वैभवच्या आई-वडीलांनी केलेल्या प्रयत्नाला यश आले. वैभव अर्थपूर्ण शब्द बोलू लागला.

'५ सप्टेंबर'रोजी वैभवने मला शिक्षकदिनाच्या शुभेच्छा फोन करून दिल्या. त्या ऐकून मी खूप धन्य झाले. माझी नियुक्ती ज्या कामासाठी झाली त्याचे मला सार्थक वाटले.

अशा प्रकारे वैभवचा प्रवास हा चालू राहील आणि त्या प्रवासात मी सदैव त्याच्या सोबतच राहील.

धन्यवाद!

***सौ. शुभांगी शेखर बनछोड***
*विशेष शिक्षक*
*मनपा, धुळे*





# नविदचा शाळेकडील प्रवास

**नविद शकील शेख**
**म.न.पा. शाळा क्र.१०,**
**इयत्ता- ९ वी**
**प्रवर्ग- सेरेब्रल पाल्सी**

मे महिन्यातील उन्हाळी सर्वेक्षण करत असताना देवपूर परिसरात नविद शकिल शेख या सेरेब्रल पाल्सी दिव्यांगत्व असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मला मिळाली. मी विचारत विचारत त्यांच्या घरी पोहोचले. नविदच्या आईशी ओळख करुन घेत मी नविद सारख्या मुलांना शिकविते, असे मी त्यांना सांगितले भेटी प्रसंगी आईने सांगितले की जन्मानंतर त्याला तीव्र तापात झटका आला होता. त्यात त्याला मेंदूचा पक्षाघात झाला. मान धरणे, बसणे, चालणे, बोलणे काहीच जमत नव्हते. तो अतिव्रीव दिव्यांगत्व प्रकारात मोडतो. अतितीव्र दिव्यांगत्व असल्या कारणाने शाळेत घेवून जाणे, वर्गात बसविणे या बाबत त्याच्या आईच्या मनात असंख्य प्रश्न होते, म्हणून त्याला कोणत्याही शाळेत दाखल केले नव्हते. मी म.न.पा.शाळा क्रमांक १० मध्ये नविदच्या प्रवेशासाठी गेले त्यावेळी असे लक्षात आले की, त्याच्या आईबाबांना पडलेले प्रश्न शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक यांना देखील पडलेले होते. परिणामी त्यांनी प्रवेश नाकारला. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या लक्षात आणून दिले की, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिनियमानुसार प्रवेशास नकार देता येत नाही. शेवटी शाळेत प्रवेश झाला.

सर्व प्रथम वर्गशिक्षिका हुमेरा शेख यांना विश्वासात घेतले. सेरेब्रल पाल्सी दिव्यांगत्वाविषयी माहिती देतांना सांगितले की, अशा विद्यार्थ्यांची वाढ व विकास सामान्य मुलांसारखर नसतो. तो उशीराने होतो. त्यांच्या पायांमध्ये ताकद नसते, मान धरणे, बसणे, नजर मिळविणे या क्रिया उशीराने होतात. काही मुलांना झटके येतात, लाळ गळते, शी-सु चे भान नसते. म्हणून त्यांची काळजी घ्यावी लागते. झटका आल्यानंतर तो पडू नये म्हणून त्याला सुरक्षित जागेवर बसविणे तर त्याचे डोळे बंद करणे, हात-पाय दाबून धरणे व त्याला स्थिर बसविणे. ह्या प्रकारची काळजी घ्यावी लागते.

मी त्याच्या आई-वडिलांशी नाविदच्या सर्व आव्हानाविषयी चर्चा करुन त्यांना विश्वासात घेतले. सुरुवातीला मात्र तो झोपूनच असायचा. मी नवीन असल्याने मला प्रतिसाद द्यायचा नाही. माझ्याकडे बघायचा नाही. मी मोबाईलमध्ये चित्र, गोष्टी, गाणे दाखवून हळू हळू त्याच्या सोबत मैत्री केली. माझ्या सतत जाण्याने तो हळूहळू प्रतिसाद देवू लागला. त्याच्या आईचा शाळेत आणण्यासाठीचा त्रास वाचवण्यासाठी समग्रशिक्षा अंतर्गत होणाऱ्या कॅम्पमध्ये व्हिलचेअर मिळवून दिली. या अलिम्को कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांच्या दिव्यांगत्वानुसार साहित्य दिले जाते. कारण त्याला शिक्षणात येणारा अडथळा दूर व्हावा व तो वर्गात बसावा. या कॅम्पमध्ये, श्रवणयंत्र, व्हिलचेअर, चेअर, सिटींग कॉर्नर, पांढरीकाठी, ब्रेललिपी, साहित्य साधने पुरविले जातात. ही सर्व माहिती नाविदच्या आई-बाबांना दिली. व्हिलचेअरमुळे नाविदच्या शाळेत येण्याचा मार्ग सुकर झाला. तो शाळेत आला की रडायचा, घाबरायचा, त्याची ओळख वर्गातील इतर मुलांसोबत व्हावी म्हणून त्यांना नाविदला खेळात सहभागी करून घेण्याचे सांगितले. आता नाविद हळू-हळू प्रतिसाद देऊ लागला.

नविदला झटके येत असल्याने मी त्याच्या आई-बाबांना जयवकील फाऊंडेशन, मुंबईतर्फे घेतल्या जाणाऱ्या मस्तिष्क आकडी कॅम्पमध्ये डॉ.अनैता हेगडे यांना दाखवायला सांगितले. या शिबीरामध्ये प्रामुख्याने पेडियाट्रिक न्यूरॉलॉजिस्ट (लहान मुलांचे आकडी मस्तिष्क तज्ज) आहारतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, ऑक्युस्पेशनल थेरेपिस्ट, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, अस्थीरोग तज्ज्ञ यांचेकडून निदान केले जाते. तज्ज्ञांनी संदर्भीत केलेल्या तपासण्या मोफत केल्या जातात. यात MRI, X-ray, Cityscan, Blood Test, Genetic Test इ. तपासण्या करून सदर विद्यार्थ्यास गरजेनुसार औषधोपचार सहा महिन्यांकरिता मोफत पुरविला जातो. यानुसार नाविदच्या आई-बाबांनी शिबिराचा लाभ घेतला. औषधोपचाराने, फिजिओथेरपीने नाविदचे झटक्यांचे प्रमाण कमी झाले. शारीरिक आधार देवून चालण्यास मदत झाली.

या सर्व थेरपी देत असतांना मला असे वाटले की नाविदला

Adeptive device ची गरज आहे. म्हणून दैनंदिन कौशल्य शिकविते वेळी कंगवा, चमचा, ब्रश यांची पकड मजबूत करण्यासाठी त्यावर कापड गुंडाळले. त्यामुळे चमचा पकडण्यास मदत झाली. गरजेनुसार कंगव्याच्या मागील बाजूस पट्टी जोडून त्याची लांबी वाढविली. त्यामुळे नाविद स्वत:च्या हाताने केस विंचरू लागला.

※ **वैयक्तिक कौशल्ये :-** १) रुमालाने लाळ व नाक पुसणे-हे कौशल्य शिकविण्यासाठी चांगल्या सवयींचे फ्लॅशकार्ड, चित्र, तसेच समवयस्कांच्या मदतीने प्रत्यक्ष कृती करून घेतली.

※ **सामाजिक कौशल्ये :-** १) इतरांना प्रतिसाद देणे

२) अभिवादन करणे.

कुटुंबातील सदस्य, व्हिडीओ, फोटो, समवयस्कांच्या प्रत्यक्षकृती यातून त्याचे सामाजिक कौशल्य वाढविले.

※ **व्यावसायिक कौशल्ये :-** मणी, माळ ओवणे

मणी ओवण्यासाठी त्याला शारीरिक व शाब्दिक मदत करून कौशल्य वाढविले.

अशाप्रकारे दैनंदिन कौशल्यासोबत वैयक्तिक, सामाजिक, व्यावसायिक कौशल्यात योग्य त्या बाबींचा सराव करून घेतला.

आता नाविद नियमित शाळेत येऊ लागला व सामान्य मुलांमध्ये मिसळून वर्गातील कृतींमध्ये सहभागी होऊ लागला. याचे समाधान नाविदचे आई-बाबा, वर्गशिक्षक व विशेष शिक्षक म्हणून मला देखील आहे.

माझा आणि नाविदचा हा प्रवास येथे संपणार नाही तर ही वाटचाल सुरूच राहणार आहे.

धन्यवाद !

***जरीना बहेन अहमदशाह फकीर***

*विशेष शिक्षक*

*मनपा, धुळे*










# समावेशित शिक्षण सक्षमीकरण विभाग

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे